महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक,
कार्यालय, यवतमाळ
एल. आय. सी. चौक, यवतमाळ.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

E-mail ID - sp.yavatmal@mahapolice.gov.in
जा.क्र. – पोअय///२०२५/ यवतमाळ,

दुरध्वनी क्र. ०७२३२ - २५६७०१
दिनांक - दि. 16/10/2025

# प्रेसनोट

## "ऑपरेशन प्रस्थान" अंतर्गत आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा – 2025 सन्मान सोहळा

यवतमाळ जिल्हयात दिनांक 22/09/2025 ते दि. 01/10/2025 पावेतो दुर्गा उत्सव साजरा करण्यात आला. आदर्श नवदुर्गा उत्सव हा जनताभिमुख व्हावा या उददेशाने यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक मा.श्री. कुमार चिंता साहेब यांचे संकल्पनेतून **यवतमाळ जिल्हा पोलीस दलाच्या वतीने ऑपरेशन प्रस्थान अंतर्गत सन २०२५ मध्ये आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा आयोजित** करण्यात आली होती. आदर्श दुर्गा उत्सव स्पर्धा मध्ये एकूण एकूण 3817 मंडळांनी सहभाग घेतला, त्यामध्ये 3203 दुर्गा मंडळ व 614 शारदा मंडळ सहभागी झाले होते.

आदर्श गणेश मंडळ स्पर्धे करिता-1) दुर्गा स्थापना व विसर्जन मिरवणूक डीजे मुक्त, 2)पारंपरिक वाद्याचा वापर, 3)रहदारी मध्ये अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेऊन मंडप उभारणी, 4) अमली पदार्थ दारू नशा यावर नीर्वंध, 5) सामाजिक उपक्रम रक्तदान, आरोग्य शिबीर, वृक्षरोपण, व्यसनमुक्ती राबविणे, 6) सीसीटीव्ही व्यवस्था, परिसर स्वच्छता, 7) ज्येश्ठ नागरीक महिलांचा सहभाग, 8)शासकीय योजनांचा प्रचार आणि प्रसार 9) सामाजिक संदेश देणारे देखावे. 10) नैसर्गीक व पर्यावरण पुरक साहित्याचा वापर. हे सर्व निकष पूर्ण करण्यात आलेल्या मंडळाना आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा करीता जिल्हा स्तरावर निवड करण्यात आली.

**पुढील प्रमाणे आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळांची निवड करून पारितोषिक वितरीत करण्यात आले .**

1) **प्रथम पारितोषिक कंवर नगर दुर्गादेवी उत्सव मंडळ सिंधी कॅम्प, यवतमाळ,**25,000 रु.(पंचवीस हजार) रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, 2) **द्वितीय पारितोषिक सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळ, उमरखेड** 21,000 रु.(एकवीस हजार) रोख रक्कम,सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र 3) **तृतीय पारितोषिक शिवशक्ती दुर्गाउत्सव मंडळ -विठठलवाडी** 15,000 रु.(पंधरा हजार) रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, देउन गौरविण्यात आले.1) हरिविष्णु दुर्गाउत्सव मंडळ, पांढरकवडा, 2) शिवराय दुर्गाउत्सव मंडळ यवतमाळ या **दोन मंडळांना प्रोत्साहनपर पारितोषिक प्रत्येकी 11,000 रु.(अकरा हजार) रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र व 16 नवदुर्गा मंडळांना प्रत्येकी 2000 रु. देवून गौरोविण्यात आले आहे. तसेच 16 नवदुर्गा मंडळांना प्रत्येकी 2000 रु. देवून गौरोविण्यात** आले आहे. आदर्श दुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा 2025 अंतर्गत सर्वोत्तम अशा एकुण 21 मंडळांना प्रशस्तिपत्रक, रोख रक्कम व बक्षीस देउन मा. जील्हाधीकारी श्री. वीकास मीना, यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता साहेब तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात साहेब, यांचे हस्ते सन्मानीत करण्यात आले आहे. **"ऑपरेशन प्रस्थान" अंतर्गत आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळ स्पर्धा – 2025 सन्मान सोहळा** जील्हाधीकारी कीर्यालय, नीयोजन भवन, यवतमाळ येथे पार पडला.

तसेच आदर्श दुर्गा उत्सव मंडळ स्पर्धे करीता मोलाचे कार्य पार पाडणारी निवड समिती सदस्य 1. डॉ.प्रशांत गावंडे, 2. प्रा. घनशाम दरणे ,3. प्रा.सौ .माणिक मेहरे 4. श्री नितीन पखाले 5. प्रा. सुवर्णा ठाकरे 6. श्री .अनंत कौल्गीकर 7. श्री. संजय सांबजवर 8. श्री.अमोल ढोणे 9. श्री. विनोद दोन्दल 10. प्रा .डॉ. ताराचंद कंठाळे 11. रवी ठाकुर 12) कोशव बने यांनी "आदर्श दुर्गा उत्सव मंडळ" निवड समिती मध्ये "आदर्श नवदुर्गा उत्सव मंडळांना भेट देऊन गुण विजेत्या आदर्श दुर्गा उत्सव मंडळाची निवड केली. त्यांना मा. जील्हाधीकारी श्री. वीकास मीना, यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक श्री..कुमार चिंता साहेब तसेच अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात साहेब, सोबत ASP पुसद श्री. बी. जे. हर्षवर्धन सर, ASP पांढरकवडा श्री. बन्सल सर, उपविभागीय पोलीस अधिकारी दारव्हा श्री भोरे सर, उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ श्री. बैसाणे सर , उपविभागीय पोलीस अधिकारी वणी श्री.

Scanned with OKEN Scanner

दळवी सर, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरखेड, श्री. गायकवाड सर यांचे हस्ते गौरवीण्यात आले. सदर कार्यक्रमाचे आयोजन यवतमाळ जिल्हा पोलीस अधीक्षक मा.श्री. कुमार चिंता साहेब यांचे मार्गदर्शनामध्ये श्री.प्रशांत कावरे पोलीस नीरीक्षक, कल्याण शाखा, यवतमाळ व त्यांची टिम यांनी केले असुन, कार्यक्रमाकरीता जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच गणेश मंडळाचे अध्यक्ष व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सपोनि शुभांगी गुल्हाने यांनी केले, कार्यक्रमाची प्रस्तावना अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक थोरात यांनी केली. व सदर सत्कार समारंभाचे आभार प्रदर्शन SDPO श्री. दिनेश बैसाणे साहेब यांनी केले.

शुभांगी रा. गुल्हाने
जनसंपर्क अधिकारी, (सपोनी.)
पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ

Scanned with OKEN Scanner